**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ ची उलटतपासणी**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -प्रमिला बबन कोलते

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ चा उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे श्री एन.एस.इंगळे यांच्या मार्फत शपथेवर पुढे सुरू.</u>**

१३. माझे शिक्षण इयता ८ वी पर्यंत झाले आहे. मला मराठी हिंदी वाचता येते. इंग्रजी वाचता येत नाही. माझे लग्न सन १९८६ मध्ये झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी माझे लग्न झाले त्यावेळी माझी आई गंगाबाई जिवंत नव्हती. प्रतिवादी क्र.१ हा माझा सगळ्यात लहाण भाऊ आहे. माझ्या लग्नाच्या पुर्वी माझी बहीण शोभा हिचे लग्न झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझी बहीण शोभा आमचे लग्न झाल्यानंतर आम्ही सासरी नांदायला गेलो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या लग्णानंतर प्रतिवादी क्र.१ व माझे वडील हे एकत्र राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नानंतर प्रतिवादी क्र.१ याने माझ्या वडीलांचा सांभाळ केला. प्रतिवादी क्र.१ याचे लग्न सन १९९७ मध्ये झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्याच वर्षी सन १९९७ रोजी प्रतिवादी क्र.१ याला नोकरी लागली. साक्षीदार स्वत:हून सांगते की, प्रतिवादी क्र.१ याला शेतीच्या भरवशावर नोकरी लागली. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९७ पासुन माझे वडील प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे त्यांच्या घरी राहू लागले. साक्षीदार स्वत:हून सांगते की, माझे वडील आधी भांडेप्लॉट, नागपुर येथे राहत होते व त्यानंतर १०-१२ वर्षाने प्रतिवादी क्र.१ याच्याकडे राहण्यासाठी गेले.

१४. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हा त्याला नोकरी लागण्यापुर्वी तो राधीका हॉटेल, नागपुर येथे सिक्युरिटी म्हणुन काम करत होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझे वडील हे प्रतिवादी क्र.१ सोबत नागपुर येथे एकत्र राहायचे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हे त्याची पत्नी, मुले व वडील असे एकत्र कुही येथे राहत असतांना त्यांच्याकडे जाणे-येणे करायच्या. साक्षीदार स्वत:हून सांगते की, वर्षातुन एकदा जायच्या. ज्यावेळी मी माझ्या भाऊ आणि वडीलांकडे जायचे त्यावेळी भाऊ व त्याचा मुलगा हा माझ्या वडीलांची सेवाचाकरी करायचा. साक्षीदार स्वत:हून सांगते की, त्यावेळी माझे वडील चालतेफिरते होते. हे माझ्या लक्षात नाही की, मी सन २०२० मध्ये प्रतिवादी क्र.१ याच्याकडे गेली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२० पर्यंत माझे वडील हे चांगल्या मनस्थितीत होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२० च्या जानेवारीमध्ये माझे वडील माझ्याकडे आले होते.

१५. माझे वडील शिकलेले होते. माझ्या वडीलांना मराठी, हिंदी व इंगजी वाचता लिहीता येत होते. माझे वडील इंग्रजीमध्ये सही करायचे. आता मला नि.क्र.४० सोबत दाखल केलेला दस्तऐवज दि.१६/१२/२०१७ रोजीच्या बक्षीसपत्रावरिल फोटो दाखविण्यात आला. त्यावरिल फोटो हा माझ्या वडीलांचा फोटो आहे. आता मला सदर बक्षीसपत्रावरील सही दाखविण्यात आली ती माझ्या वडीलांची सही नाही.

१६. हे म्हणणे खरे आहे की, वादातीत मिळकत गट क्र.२२ आ.रा.जी.१.८६ हे.आर. मौजा किनाळा ही महसुल विभागाच्या नि.क्र.१९ वरिल नोंदीप्रमाणे माझ्या वडीलांच्या नावावर सन २०२१ मध्ये होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर वादमिळकतीचे माझे वडील एकमेव मालक होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर वादमिळकत ही माझ्या वडीलांची एकमेव असल्याने त्यांना हस्तांतरणाचा एकमेव अधिकार होता. साक्षीदार स्वत:हून सांगते की, वादमिळकत ही माझ्या आजोबाची होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील हे वादमिळकतीचे एकमेव मालक असल्याने त्यांनी प्रतिवादी क्र.२ च्या नावाने बक्षीसपत्र करून ठेवलेले आहे. मी शितल शिवरकर यांना ओळखते. तो माझा कोणी नातेवाईक नाही.

१७. हे मला माहित नव्हते की, सन २०१७ मध्ये माझ्या वडीलांनी प्रतिवादी क्र.२ यांच्या हक्कामध्ये वादमिळकतीचे बक्षीसपत्र करून दिले होते. मी सदरचा दावा शितल शिवरकर यांच्या सांगण्यावरून दाखल केला. साक्षीदार स्वत:हून सांगते की, आम्ही त्यांना विचारले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी यांच्याविरूध्द दावा दाखल करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न झाले त्यावेळी माझ्या वडीलांनी मला दोन लाख रूपये दिले होते व त्यामधुन मी माझ्या आवश्यक गरजा पुर्ण केल्या होत्या व मी असे कबुल केले होते की, माझ्या वडीलांच्या मिळकतीमध्ये हक्क मागणार नाही. मला पिंकी/राणी नावाची मुलगी आहे व तिचे लग्न सन २०१९ मध्ये झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर लग्णामध्ये माझे वडील व प्रतिवादी क्र.१ हे आले होते. साक्षीदार स्वत:हून सांगते की, त्यावेळेस आमचा चांगला रिश्ता होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीच्या लग्णात माझ्या वडीलांनी व प्रतिवादी क्र.१ ने पैशाची मदत केली होती. साक्षीदार स्वत:हून सांगते की, त्यांनी माझ्या मुलीला फ्रिज आंदण म्हणुन आणले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझ्या वडीलांची तब्येत चांगली होती.

१८. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचा अंतिम विधी प्रतिवादी क्र.१ व त्यांचा मुलगा महेश यांनी केला. साक्षीदार स्वत:हून सांगते की, मुलगा या नात्याने वडीलांचा विधी मुलगाच

करेल. हे म्हणणे खरे नाही की, शितल शिवणकर यांच्या सांगण्यावरून मी खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी प्रतिवादी क्र.२ यांच्या हक्कात बक्षीसपत्र करून दिल्याने माझा वादमिळकतीत काही हक्क राहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस दाखल केली व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि १०/११/२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड